**<u>मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम.</u>**
**निवडीचे निकष, अटी व शर्ती आणि**
**कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१०१७/प्र.क्र.९७/का.१४२६,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २४ मे, २०१७.

**<u>वाचा</u>:**
१) सा.प्र.वि. शासन निर्णय क्र.एसआरव्ही २०१४/प्र.क्र.४००/२०१४/१२ दि.२९.०५.२०१५
२) सा.प्र.वि. शासन निर्णय क्र.एसआरव्ही २०१४/प्र.क्र.४००/२०१४/१२ दि.२०.०५.२०१६

**<u>प्रस्तावना</u> :-**

राज्यातील विकास प्रक्रिया व त्यातील टप्पे जाणून घ्यावेत व ते समजून घेत असताना शासकीय यंत्रणेतील कामकाज, त्यातील घटकांचा ताळमेळ आणि निर्णयप्रक्रियेचा अनुभव तरुणांनी मिळवावा, त्यातून समर्पित वृत्तीने समाजसेवा करण्यासाठी प्रामाणिक, ध्येयवादी, सुजाण नागरिक तयार व्हावेत, यास्तव संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये “मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम” सुरु करण्यात आलेला आहे. तसेच, संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये सदर फेलोशिप कार्यक्रमाची राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर कार्यक्रमाची अंमलबजावणी करताना आलेल्या अनुभवांच्या आधारे सदरहू कार्यक्रम आता नियोजन विभागामार्फत राबविण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे. यानुषंगाने कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमधून प्राप्त होणाऱ्या अनुभवांच्या आधारे, भविष्यातील योजना कशी असावी हे विचारात घेऊन सदर कार्यक्रमात आवश्यक त्या सुधारणा करण्याची बाब विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :-**

२. “मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रमा” च्या अनुषंगाने फेलोंच्या निवडीसंबंधातील निकष तसेच फेलोंच्या नियुक्तीसंदर्भातील अटी व शर्ती आणि अंमलबजावणीबाबत खालीलप्रमाणे सुधारित निर्णय घेण्यात येत आहेत :-

(अ) <u>फेलोंच्या निवडीसंबंधातील निकष :-</u>

१) निवडीसाठी शैक्षणिक अर्हता :- कोणत्याही शाखेतील पदवीधर (किमान ६०% गुण आवश्यक) याशिवाय अधिक उच्च शिक्षणास प्राधान्य.
२) अनुभव :- किमान एक वर्षाचा अनुभव आवश्यक राहील. तसेच, व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या अभ्यासक्रमाचा भाग म्हणून पूर्णवेळ इंटर्नशीप / ॲप्रेटिंसशीप / आर्टिकलशिपसह एक वर्षाचा अनुभव आवश्यक राहील. सदर कालावधी अनुभवाचा कालावधी म्हणून ग्राह्य धरण्यात येईल.
३) भाषा व संगणक ज्ञान :- मराठी भाषा लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक राहील. हिंदी व इंग्रजी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक आहे. तसेच, संगणक हाताळणी व इंटरनेटचे ज्ञान आवश्यक राहील.
४) वयोमर्यादा :- ज्यांचे किमान वय २१ वर्षे व कमाल वय २६ वर्षे आहे.
५) अर्ज करण्याची पध्दती :- ऑनलाईन ॲप्लीकेशन सिस्टीमव्दारे उमेदवाराने अर्ज करावयाचा आहे.

६) अर्जाकरीता आकारण्यात येणारे शुल्क :- रु.५००/-

७) फेलोंची संख्या :- सदरहू कार्यक्रमांतर्गत फेलोंची संख्या ५० अशी निश्चित करण्यात आली असून, त्यापैकी महिला फेलोंची संख्या एकूण संख्येच्या १/३ राहील. १/३ एवढ्या महिला फेलो उपलब्ध न झाल्यास त्याजागी पुरुष फेलो निवडण्यात यावेत.

८) फेलोंचा दर्जा :- फेलोंचा दर्जा शासकीय सेवेतील गट-अ च्या अधिकाऱ्याच्या समकक्ष असणार आहे.

९) नियुक्तीसंदर्भातील कार्यवाही :- फेलोंच्या निवडीसाठी जाहिरात देणे, अर्ज मागविणे, अर्जाची छाननी करणे, परीक्षा घेणे, उमेदवारांची निवड करणे, नियुक्ती देणे व त्यानुषंगाने पदनिर्मिती करणे, याबाबतची आवश्यक ती कार्यवाही नियोजन विभागाच्या अधिपत्याखालील अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत करण्यात येईल.

१०) निवडीची कार्यपध्दती :-

i) फेलोशिपसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारास ऑनलाईन अर्ज करून ऑनलाईन शुल्क भरावे लागेल.

ii) शुल्क भरणाऱ्या उमेदवारास ऑनलाईन वस्तुनिष्ठ चाचणी परीक्षा (Online Objective Test) द्यावी लागेल.

iii) चाचणी परीक्षेनंतर विशिष्ट कालावधीत उमेदवारास दिलेल्या तीन विषयांवरील निबंध ऑनलाईन सादर करावे लागतील.

iv) वस्तुनिष्ठ चाचणी परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या २०० उमेदवारांची मुलाखत मुंबई येथे घेण्यात येईल.

v) या २०० उमेदवारांच्या मुलाखतीसाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात यावी :-

| | | | |
|---|---|---|---|
| १ | संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई | -- | अध्यक्ष |
| २ | विशेष कार्य अधिकारी , मुख्यमंत्री सचिवालय | -- | सदस्य |
| ३ | अर्थ व सांख्यिकी संचालनालयाने किंवा मुख्यमंत्री सचिवालयाने सुचविलेले उपसचिव किंवा त्यावरील दर्जाचे अधिकारी * | -- | सदस्य |
| ४ | मुख्य संशोधन अधिकारी, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई | -- | सदस्य सचिव |

* संबंधित विभागाने त्यांना नामनिर्देशित करणे आवश्यक राहील.

vi) अंतिम निवड करतांना वस्तुनिष्ठ चाचणी, निबंध व मुलाखत यासाठी अनुक्रमे १५, ३० व ५० असे गुण राहतील. पदव्युत्तर पदवी वा व्यावसायिक पदवी / पदविका यांच्या उपयुक्ततेनुसार गुण राहतील.

vii) मुलाखतीच्या वेळी शैक्षणिक अर्हतेबरोबरच उमेदवाराची सामाजिक व सार्वजनिक कामासंबंधात बांधिलकी, सशक्त चारित्र्य, सकारात्मक

दृष्टिकोन, संघभावनेने काम करण्याची वृत्ती, संबंधित कामाचा अनुभव या आणि इतर बाबी विचारात घेऊन, ५० उमेदवारांची अंतिम निवड करण्यात येईल.

viii) अंतिम निवड करताना वस्तुनिष्ठ चाचणी, निबंध व मुलाखत यासाठी अनुक्रमे १५, ३० व ५० असे गुण राहतील. पदव्युत्तर पदवी वा नामांकित संस्थेतून मिळविलेली व्यावसायिक पदवी/ पदविका यांच्या उपयुक्ततेनुसार ५ गुण राहतील.

११) फेलोशिप कार्यक्रमासाठी नियुक्तीचा कालावधी : -
सदरहू कार्यक्रमांतर्गत ५० फेलोंची ११ महिन्यांकरिता निवड करण्यात येणार आहे, यामध्ये अधिक वाढ करता येणार नाही.

१२) विद्यावेतन (छात्रवृत्ती) :-
सदरहू कार्यक्रमांतर्गत निवड झालेल्या ५० फेलोंना दरमहा रु.३५,०००/- इतकी छात्रवृत्ती (Stipend) देण्यात येईल. सदर छात्रवृत्तीव्यतिरिक्त दरमहा रु.५,०००/- प्रवासखर्च देण्यात येईल.

१३) प्रशिक्षण :-
७ दिवसांच्या कालावधीचे प्रशिक्षण देण्यात येईल. सदरहू ७ दिवसांचा कालावधी ११ महिन्यांतर्गत अंतर्भूत धरण्यात येईल.

(ब) <u>फेलोंच्या नियुक्त्यांच्या अनुषंगाने विहित करण्यात येत असलेल्या अटी व शर्ती</u> :-

१) फेलोंच्या नियुक्तीनंतर अ) पोलीस व्हेरिफिकेशन ब) रजिस्टर्ड मेडिकल प्रॅक्टिशनरचे फिटनेस सर्टिफिकेट क) फेलोंच्या शैक्षणिक अर्हतेच्या सत्यतेबद्दल कागदपत्रांची तपासणी इ. या बाबी अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत करण्यात येतील.

२) उमेदवारांकडून पसंतीक्रम घ्यावयाचा नसल्याने किमान मुलाखतीदरम्यान त्यांचा कल जाणून घेऊन त्यानुसार त्यांना विभाग नेमून दिले जातील.

३) नियुक्ती देण्यात आलेल्या प्रत्येक फेलोला स्वखर्चाने नियुक्तीच्या ठिकाणी हजर व्हावे लागेल.

४) ज्या कार्यालयांत फेलोंची नियुक्ती करण्यात येईल त्या कार्यालयाने संबंधित फेलोंना लॅपटॉपची/ संगणकीय सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत कार्यवाही करावी. फेलोशिपचा कालावधी संपल्यानंतर वा फेलोशिप सोडून गेल्यास उपलब्ध करून देण्यात आलेल्या संगणकीय सुविधा परत घेण्यात याव्यात.

५) फेलो म्हणून नियुक्ती झाल्यानंतर नियुक्तीच्या कालावधीत एखादा फेलो उज्वल भवितव्य असलेल्या किंवा सबळ कारणास्तव त्याने कार्यक्रम सोडल्यास त्याच्याकडून कोणत्याही प्रकारची वसुली करण्यात येणार नाही.

६) फेलोंना फेलोशिपच्या काळात वापरण्यासाठी ओळखपत्र व अधिकृत शासकीय ई-मेल आयडी देण्यात येईल. या कार्यक्रमांतर्गत निवड करण्यात आलेल्या उमेदवाराला ११ महिन्यांच्या कराराने फेलोशिप देऊन नियुक्ती करण्यात येईल. सदरहू ११ महिन्यांच्या कालावधीत ७ दिवसांचा प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्भूत

धरण्यात येईल. मात्र, कराराच्या कालावधीत अध्ययन वेतन किंवा अध्ययन वेतन / मानधन यामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ अनुज्ञेय असणार नाही.

७) महागाई भत्ता, अंतरीम किंवा वेतन आयोगाचे कुठलेही सेवाविषयक लाभ मिळविण्यास ते पात्र नसतील.

८) करार कालावधीत त्यांना वैद्यकीय प्रतिपुर्ती अनुज्ञेय नसेल.

९) करार कालावधीतील सेवा, निवृत्ती वेतन, बोनस, रजा प्रवास सवलत, रजा रोखीकरण किंवा अन्य कोणत्याही आर्थिक लाभासाठी विचारात घेण्यात येणार नाही.

१०) फेलोंना कर्तव्यासाठी मुख्यालयापासून अन्यत्र प्रवास करण्यासाठी दरमहा रु.५,०००/- प्रवास भत्त्याव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय राहणार नाही.

११) व्यवसाय कराची वसुली त्यांच्या अध्ययन वेतन/ मानधनातून करण्यात येणार नाही. (वित्त विभागाचे परिपत्रक क्र. PFT-१०७६/प्र.क्र.२९/७६ दि.५.६.१९७६)

१२) अध्ययन वेतन / मानधन मिळविणाऱ्या व्यक्तीला करार करण्यापूर्वी नियुक्ती प्राधिकारी निर्धारित करेल, अशी वैयक्तिक / अपघात विमा योजना अंतर्गत विमा उतरविण्याबाबत वित्त विभागाच्या नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

१३) सम संवर्गातील अधिकारी जे कर्तव्य बजावतील ती कर्तव्ये फेलोंची राहतील. त्यानुसार फेलो कार्यालयातील सर्व नियमांचे पालन करुन, निर्धारित वेळेनुसार कार्यालयात उपस्थित राहून, कर्तव्य पार पाडतील. तसेच या कालावधीत फेलो खाजगी प्रॅक्टिस किंवा पार्ट टाइम नोकरी करु शकणार नाहीत. सुटीच्या दिवशी जर सरकारी कामासाठी कर्तव्य बजावावे लागले, तर त्यासाठी त्यांना कामावर हजर राहणे भाग पडेल.

१४) कराराच्या ११ महिन्यांच्या कालावधीत त्यांना १० दिवसांची किरकोळ रजा मिळण्यास ते पात्र असतील, अन्य कुठल्याही रजा त्यांनी उपभोगली असल्यास, अध्ययन वेतन / मानधनातून त्याप्रमाणे कपात करण्यात येईल.

१५) फेलोंनी मुख्यालयात उपस्थित राहणे गरजेचे आहे व प्राधिकृत अधिकाऱ्याची पूर्वपरवानगी न घेता त्यांना मुख्यालय सोडता येणार नाही.

१६) कराराधारित अध्ययन वेतन/मानधनावर नेमणूक मिळविणाऱ्या व्यक्तीला सरकारी नोकरीत समाविष्ट होण्याचा कुठलाही हक्क प्राप्त होणार नाही.

१७) करार कालावधीत फेलोचा मृत्यु झाल्यास वा अपंगत्व आल्यास, त्यांनी बजाविलेल्या कर्तव्य काळातील अध्ययन वेतन/ मानधन याची रक्कम त्यांच्या कुटुंबियांना देण्यात येईल. परंतु, सानुग्रह अनुदान किंवा अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यात येणार नाही.

१८) फेलोंनी केलेल्या कामगिरीबाबत, कराराच्या कालावधीत तसेच कार्यक्रमाची मुदत संपल्यावरही पूर्ण गुप्तता बाळगण्यात येईल. कराराच्या दरम्यान त्यांनी केलेल्या कामगिरी / संशोधन / माहिती जमा करणे / मिळालेल्या माहितीच्या आधारे तयार केलेले मुद्दे याबाबत कराराच्या कालावधीत किंवा त्यानंतरही त्यांना कुठलीही माहिती प्राधिकृत अधिकाऱ्याच्या व्यतिरिक्त कोणासही देता येणार नाही.

१९) फेलोशिपच्या कालावधीत फेलो कुठल्याही राजकीय चळवळीत भाग घेऊ शकणार नाहीत. तसेच, त्यांच्याकडून कोणतेही अशोभनीय कृत्य घडणार नाही याची त्यांनी दक्षता घ्यावयाची आहे. फेलोशिप उमेदवारांनी सचोटी राखणे, निवडणूकीत भाग न घेणे वृत्तपत्रांना माहिती न देणे, कोणत्याही स्वरुपाच्या देणग्या न घेणे याची दक्षता घ्यावी.

२०) फेलोंनी प्रत्येक महिन्याला त्यांचा अहवाल ई-मेल व्दारे मेंटर व संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई यांना सादर करावा.

२१) प्रत्येक अहवालात फेलोंनी केलेल्या चांगल्या सूचना व त्या अनुषंगाने करावयाच्या अपेक्षित सुधारणा तसेच इनपुट (Input) व आऊटकम (Outcome) बाबत माहिती ठेवावयाची आहे. फेलोंनी त्यांच्या फेलोशिपच्या काळात कोणत्या बाबी शिकल्या त्याबाबतची नोंद अहवालात करावी.

२२) फेलोंच्या कामगिरीचे मूल्यमापन संचालक अर्थ व सांख्यिकी संचालनालय प्रत्येक तिमाहीच्या शेवटी करतील.

२३) ज्या प्रशासकीय विभागात/जिल्ह्यामध्ये ज्या योजनेवर/प्रकल्पासाठी फेलोंची नियुक्ती करण्यात आली आहे, त्याच्याशी संबंधित प्रशासकीय विभागांनी फेलोंसाठी इंटरनेट जोडणीसह बसण्याची व्यवस्था करावी.

२४) फेलोंना राज्यातील प्रकल्पांना / आस्थापनांना आपल्या मेंटरची पूर्वमंजूरी घेऊन भेटी देता येतील. यासंदर्भात ज्या प्रकल्पांना / आस्थापनेस भेट द्यावयाची आहे त्यांच्या प्रमुखास पूर्व कल्पना देण्यात यावी.

२५) फेलोशिपच्या संपूर्ण कालावधीत तसेच तद्नंतर फेलोंनी केलेल्या कोणत्याही स्वरुपाच्या गुन्हेगारी वा बेकायदेशीर कृत्यांच्या अनुषंगाने त्याच्यावर करण्यात येणाऱ्या कारवाईची जबाबदारी सर्वस्वी फेलोंवर राहील.

२६) कराराच्या कालावधीत असमाधानकारक कामगिरी किंवा गैरशिस्तीच्या कारणामुळे कोणतीही नोटीस न देता त्यांचा फेलो म्हणून नियुक्ती बाबतचा करार समाप्त करण्यात येईल.

२७) शासनाच्या हितासाठी या अटी/शर्तीमध्ये बदल/वाढ करण्यात आली तर त्या फेलोंवर बंधनकारक राहतील.

२८) कराराची मुदत संपताच, फेलोंची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

२९) उपरोक्त सर्व अटी/शर्ती मान्य आहेत, या आशयाचे संमतीपत्र नियुक्ती देण्यापूर्वी फेलोंकडून घेण्यात येईल.

३. फेलोंच्या नियुक्तीच्या अनुषंगाने पदनिर्मिती करणे, तसेच, मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रमाच्या प्रयोजनार्थ अर्थसंकल्पात विहित अर्थसंकल्पीय पध्दतीचे पालन करुन आर्थिक तरतूद करणे याबाबतची आवश्यक ती कार्यवाही नियोजन विभागाच्या अधिपत्याखालील अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत करण्यात येईल.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०५२४१५५७४७२०१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Pradnya S Mahale

Digitally signed by Pradnya S Mahale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=31c8683f52ccbefd97bce49983c4151d2caf1c185c657ea855ac85f31e5f681e, cn=Pradnya S Mahale
Date: 2017.05.24 16:07:07 +05'30'

**(प्रज्ञा महाले)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, विधानभवन, मुंबई,
५. सर्व मा. संसद सदस्य/विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
६. मा.मुख्य सचिव,
७. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
८. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मुंबई
९. सर्व मंत्रालयीन विभाग.
१०. ग्रंथपाल , महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई ४०० ०३२ संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई
११. महालेखापाल, महाराष्ट्र १ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
१२. महालेखापाल, महाराष्ट्र १ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई
१३. महालेखापाल, महाराष्ट्र १ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
१४. महालेखापाल, महाराष्ट्र १ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर
१५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई (२ प्रती)
१६. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१७. निवासी लेखा परीक्षाधिकारी, मुंबई
१८. सर्व विभागीय आयुक्त
१९. सर्व जिल्हाधिकारी
२०. सर्व जिल्हा परीषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२१. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२२. बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई १ (५ प्रती)
२३. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ. बॅरक नं.१ योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरीमन पॉईंट, मुंबई २० (५ प्रती)
२४. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस. व्ही.पटेल रोड, मुंबई ४ (५ प्रती)
२५. भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई -१३,

२६.इंडियन नॅशनल  काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई २५ (५ प्रती)
२७.नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई २१  (५ प्रती)
२८.  शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई २८ (५ प्रती)
२९.सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
३०.निवड नस्ती.